# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.07.2025** **वार- गुरुवार**

---

**रासने**

पुणे महापालिकेकडून सध्या मूळ मालक स्वतः राहत असलेल्या मिळकतींवर ४० टक्के कर सवलत दिली जाते. मात्र, त्या मिळकतीत भाडेकरू राहत असल्यास ही सवलत रद्द केली जाते. हा दूजाभाव न करता सर्व मिळकतधारकांना सरसकट ४० टक्के करसवलत मिळावी, अशी मागणी कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनी आज विधानसभेत केली. नगरविकास विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान रासने बोलत होते. पुणे शहराचं गावठाण असणाऱ्या कसबा मतदारसंघात अनेक जुनेवाडे असून युडीसीपीआर नियमावलीतील एक मीटर साईड मार्जिनच्या अटींमुळे पुनर्विकासात अडथळे येत आहेत. या नियमात तातडीने शिथिलता देऊन जुन्यावाड्यांचा पुनर्विकास मार्गी लावणे गरजेचं आहे अशी मागणी देखील रासने यांनी केली आहे.

**परिचारिका**

वैद्यकीय शिक्षण विभागातील सेवाशर्ती, भरती प्रक्रिया आणि कामकाजाच्या अडचणींबाबत ठोस उपाययोजनांवर विचार करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर बैठक आयोजित करण्याचं आश्वासन वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिलं. 'महाराष्ट्र सरकार परिचारिका महासंघातर्फे विविध प्रलंबित मागण्यांसाठी काल मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्यात आलं होतं. त्यानंतर मिसाळ यांना संघटनेच्या विविध मागण्यांचं निवेदन देण्यात आल्यानंतर त्यांनी शिष्टमंडळाशी सकारात्मक चर्चा केली.

**लेकलाडकी**

मुलींच्या जन्माचं स्वागत करावं, त्यांच्या जन्मांचं प्रमाण वाढावं, यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'लेक लाडकी' योजनेला पुणे जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे असं जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी

अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितलं. ‘लेक लाडकी’ योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यातून एका वर्षभरात नऊ हजार ७९६ अर्ज दाखल झाले आहेत. त्यापैकी सहा हजार ५७३ लेकींच्या खात्यात जन्मानंतर पाच हजार रुपयांचा पहिला हप्ता जमा केला आहे.

**विलिनीकरण**

खडकी आणि पुणे या दोन्ही कॅन्टोन्मेंटचं पुणे महानगरपालिकेत विलिनीकरणाबाबत आज राज्य सरकारच्या वतीनं तत्वतः मान्यता देण्यात आली आहे अशी माहिती पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदार संघाचे आमदार सुनील कांबळे यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत यासंदर्भात बैठक झाली.

**बस**

पीएमपीतर्फे सुरू असलेल्या ‘पुणे दर्शन’ आणि ‘पर्यटन बस’ सेवेला गेल्या महिन्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि ६ लाख ४८ हजार रुपये उत्पन्न प्राप्त झालं. ‘पुणे दर्शन’ आणि ‘पर्यटन बस’ सेवा प्रत्येक आठवड्याच्या शनिवार, रविवार, सुरू करण्यात आली होती. इतर दिवशी १५ ते २० प्रवाशांनी नोंदणी केल्यास कोणत्याही दिवशी बस सोडण्यात येते असं मुख्य वाहतूक व्यवस्थापक सतीश गव्हाणे यांनी सांगितलं.

**सक्षमा**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्याद्वारे राबविण्यात येणाऱ्या सक्षमा प्रकल्पाच्या अंतर्गत महिला बचत गटांच्या वस्तू विक्रीसाठी तयार करण्यात आलेल्या ‘SHG ई-पोर्टल’वरील ‘सक्षमा’ पेजचं उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह  यांच्या हस्ते करण्यात आलं. या नव्या डिजिटल उपक्रमाच्या माध्यमातून महिलांनी बनविलेल्या वस्तूंना नव्या बाजारपेठा उपलब्ध होतील आणि त्यातून रोजगार आणि उत्पन्नाच्या संधी मोठ्या प्रमाणावर निर्माण होतील. सक्षमा प्रकल्पाअंतर्गत आतापर्यंत ८ महिला संघांची स्थापना करण्यात आली आहे. विविध क्षेत्रीय कार्यालयांतील संघाच्या महिला पदाधिकाऱ्यांचा प्रोत्साहनपर सन्मान याप्रसंगी करण्यात आला.

**मेट्रो**

आगामी गणेशोत्सव आणि प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन पुणे मेट्रोची वारंवारीता पाच मिनिटं करण्यात येणार आहे. सध्या गर्दीच्या वेळी दर सात मिनिटं आणि इतर वेळी १० मिनिटांच्या अंतरानं मेट्रो सोडली जाते.

**सायबर**

डिजिटल फसवणूक, सायबर गुन्हे रोखण्यासाठी तंत्रज्ञ आणि पोलीस यंत्रणेसोबतच नागरिकांचाही सहभाग तितकाच महत्वाचा असल्याचं मत पिंपरी-चिंचवडचे पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांनी आज व्यक्त केलं. सूर्यदत्त इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायबर सिक्युरिटीमध्ये  राष्ट्रीय सायबर संसाधन केंद्राचं आज उद्घाटन करताना ते बोलत होते.

**मोर्चा**

पुणे होमिओपॅथी डॉक्टरांनी औषधशास्त्र या विषयाचा एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांना ‘आधुनिक वैद्यकीय व्यवसायी’ म्हणून मान्यता देत त्यांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमध्ये नोंदणी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याला विरोध दर्शविण्यासाठी भारतीय वैद्यकीय संघटनेच्या पुणे शाखेनं काल जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. आयुर्वेद अभ्यासक्रमाचं शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरांना अॅलोपॅथीचा व्यवसाय करण्यास केंद्र सरकारनं मान्यता दिली असून, आता होमिओपॅथी डॉक्टरांना औषधशास्त्र या विषयाचा एक वर्षाचा सीसीएमपी हा ब्रिज कोर्स पूर्ण केल्यावर महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी करण्यासाठी राज्य सरकारनं आदेश काढला आहे.

**धरण**

पिंपरी चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणारं पवना धरण 77 टक्के भरलं आहे. पाणलोट क्षेत्रात पाऊस चालू असून धरणामध्ये पाणी जमा होत आहे. धरणातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी आज सकाळपासून नदीपात्रामध्ये पाण्याचा विसर्ग  चालू आहे. त्यामुळं कोणीही नदीपात्रात उतरू नये. नदीमधील पाण्याचे पंप, नदीकाठची शेती अवजारं आणि तत्सम साहित्य अथवा जनावरं असल्यास ती तत्काळ सुरक्षित ठिकाणी हलवावीत अशी सूचना महापालिका प्रशासनानं केली आहे.

पुणे आणि परिसरात आज बराचवेळ सूर्यदर्शन झालं. उद्याही असंच हवामान राहून कमाल तापमान 31 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**